# अधिदान व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन

PHONE NO. २६५६६३३१
e-mail : pao@mahakosh.in
Fax No. ०२२-२६५९१५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

---

क्र.अले/आस्था/एच/जडसंग्रह निर्लेखन/फा.क्र.२६-ब/ परि-३/ दि. - 3 JAN 2019

## लिलाव विक्रीची सूचना

अधिदान व लेखा कार्यालयातील जुने व निकामी झालेल्या जडसंग्रह वस्तूंची लिलावाने विक्री करावयाची आहे. सदर निकामी वस्तूंसाठीचे दर एकत्र द्यावयाचे आहेत. लिलावाचा जास्तीत जास्त देकार (दर) देणाऱ्यास सामान (वस्तू) देण्यात येतील. ज्या संस्थेचे / व्यक्तीचे दर स्विकारण्यात येऊन मंजूर केले जातील, त्यातील त्यांचे दर मंजूर केल्यानंतर लिलावाची रक्कम रोख स्वरूपात त्याच दिवशी कार्यालयात जमा करून निकामी सामान घेऊन जाणे बंधनकारक राहिल अन्यथा त्यांचे दर रद्द ठरवून निकामी सामानाची विक्री अन्य संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवत आहे.

कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच, लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरांवर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्थांनी / व्यक्तींनी लिलावात सहभागी होण्यासाठी आपले दर बंद लिफाफ्यातून कार्यालयाच्या उपरोक्त पत्त्यावर दि.16.01.2019 पर्यंत पाठवावे व लिफाफ्यावर **जुने व निकामी झालेल्या साहित्याची लिलावाने विक्री** असे ठळकपणे नमूद करावे. प्राप्त झालेले बंद लिफाफे दि.17.01.2019 रोजी मा. अधिदान व लेखा अधिकारी यांचे दालनात सकाळी 11:00 वाजता उघडण्यात येतील तरी सहभागी संस्थांनी / व्यक्तींनी विहित वेळेत कार्यालयात उपस्थित रहावे.

## अटी व शर्ती

१. ज्या संस्थेचा / व्यक्तीचा देकार मंजूर करण्यात येईल अशा संस्थांनी निकामी सामान कार्यालयाच्या आवारात व आवारातून बाहेर नेताना वाहतुकीचा, हमालीचा व सामान हाताळणीचा खर्च स्वत: सोसावयाचा आहे.
२. निकामी सामान कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन कामकाजात कोणता अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. निकामी सामान कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन वस्तूंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरूपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.
४. निकामी सामान जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत घ्यावे लागेल.
५. निकामी सामान कार्यालयीन आवाराच्या बाहेर त्वरीत नेणे बंधनकारक राहिल.

६. जुने निकामी सामान पहावयाचे झाल्यास दि.04.01.2019 ते दि. 16.01.2019 या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी २ ते ४ या वेळेत पाहता येईल.

७. ज्या संस्थेच्या / व्यक्तीच्या लिलावाचे दर सर्वात जास्त असतील अशा पक्षकाराने लिलावाची संपूर्ण रक्कम लिलाव संपल्यानंतर त्याच दिवशी रोखीने कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहिल.

(वै. रा. राजेघाटगे)
**अधिदान व लेखा अधिकारी**
**तथा लिलाव समिती अध्यक्ष**

प्रत :-

१. कार्यालयीन सूचना फलक वांद्रे / चर्चगेट.
२. कार्यालयीन नस्ती.